होऊ शकेल अशी (फोन ५५५५३७७): ५) ठाणे-
आहे.

एकांकिका लेखन स्पर्धेत मनोज महाजन प्रथम

मुंबई, गुरुवार , (लो. प्र.)- अखिल भारतीय दलित नाट्य परिषदेने आयोजित केलेल्या एकांकिका लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, मनोज महाजन यांच्या 'नॉट फॉर द प्रेस' २५० रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले आहे.

इतर पारितोषिक विजेत्या एकांकिका पुढीलप्रमाणे, द्वितीय (२०० रुपये)- कथा सुखांतिका शोकांतिकेची (ले. जीतेंद्र पानपाटील), तृतीय (१५० रुपये)- 'माणुसकीचं मढं' (ले. प्रा. विश्वास पाटील), उत्तेजनार्थ दोन पुरस्कार अनुक्रमे १०० रुपयांचे 'फुंकर' (ले. चित्तरंजन घोटीकर) व काळूराम गंगाराम (ले. सुरेश चांदवणकर).

या एकांकिकांचा पुरस्कार वितरण समारंभ नाशिक येथे होणाऱ्या सहाव्या दलित नाट्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी होईल, असे परिषदेतर्फे सांगण्यात आले. वरील एकांकिकांचे परीक्षक म्हणून अशोक हंडोरे व प्रेमानंद गज्वी यांनी काम पाहिले.

काळूराम गँगाराम

संक्षिप्त कथानक –

काळूराम गँगाराम हा एक आदिवासी तरुण. नागरी जीवनाशी संपूर्णपणे अपरिचित. एका विचित्र अपघातात किरणोत्साराची (Radioactivity) बाधा झाल्यानं त्याचा शहरी जीवनाशी संबंध येतो. संपूर्ण नभोनाट्यात एकही शब्द न बोलणारा काळूराम गँगाराम जनसामान्यांचा प्रतिनिधी या रूपानं वावरतो. या अपघाताच्या नंतर किरणोत्सारी पदार्थ तयार करणाऱ्या व हाताळणाऱ्या केंद्रामध्ये प्रचंड खळबळ उडते. केंद्रातील प्रत्येक घटक या घटनेकडे स्वतःच्या दृष्टिकोनातून कसा बघतो, त्यातून स्वतःच्या फायदा कसा करून घेतो याचे चित्रण करण्याचा प्रयत्न ~~या~~ ह्या नभोनाट्यात केला आहे.

लेखकाची भूमिका –

मानवी जीवनात अपघात – मग ते निसर्गाच्या कोपामुळे असोत की मानवनिर्मित – ही अटळ गोष्ट आहे. आधुनिक नागरिक जीवनात अपघात हा जीवनाचाच एक अविभाज्य भाग बनून गेला आहे. त्यामुळे नागरिकांच्या संवेदना बधीर होत चालल्या असून आणीखही बोथट होत चालल्या आहेत. अशावेळी एखादा दुर्दैवी अपघात घडून गेल्यानंतरही त्यातूनच स्वतःचाही ऐहिक स्वार्थ साधून घेणारी मंडळी अवतीभवती आढळतात. अशा प्रवृत्तींचे अलिप्तपणानं चित्रण करणं ही या लिखाणामागची भूमिका आहे.

काळूराम गंगाराम

[डॉक्टर अजय चक्रवर्ती, प्रमुख किरणोत्सार सुरक्षा विभाग यांचे कार्यालय. त्यांचा सहकारी डॉक्टर रमेश प्रवेश करतो]

<u>रमेश</u> - मे आय् कम इन् सर?

<u>अजय</u> - यस्. कम इन्, कम इन. कोण? रमेश? अरे, तुम्ही आहात तुम्ही? कसा काय झाला तुमचा दौरा? कॉन्फरन्स कशी झाली?

<u>रमेश</u> - आज सकाळीच आलो साहेब. खराब हवामानामुळं बराच वेळ आकाशातच घिरट्या घालाव्या लागल्या. एकदा तर विमान परत दिल्लीकडे नेत असल्याची घोषणा पण झाली. शेवटी एकदाचं उतरायला मिळालं इथेच.

<u>अजय</u> - अच्छा म्हणजे आगोदरचा जर्मनीहून इतक्या लांबवरचा प्रवास अन् मायदेशी परतल्यावरती हे असं तुम्हा ताटकळणं. बरं परिषद् कशी काय झाली? कोणकोण मंडळी आली होती? कोणकोणत्या विषयांवरती चर्चा झाली? आपला शोधनिबंध कसा काय वाटला सर्वांना? त्याच्यावरती काय प्रतिक्रिया?

<u>रमेश</u> - सांगतो सांगतो, सगळं सांगतो. आपल्याला ठाऊकच आहे की परिषदेचा मुख्य विषय किरणोत्सर्जक पदार्थांची हाताळणी -Handling of Radioactive materials- हा होता. वैद्यकीय उपचारांसाठी व प्रयोगशाळेतील कामासाठी अशा पदार्थांचा फार मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला आहे. बहुतेक सर्व देशांमध्ये या पदार्थांची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर होते. शिवाय देशांतर्गतपण विविध ठिकाणांवरती या पदार्थांची हाताळणी व उपयोग आता सर्रास केला जातोय.

<u>अजय</u> - अरे रमेश, हे सगळं मला ठाऊक नाही असं का म्हणायचंय तुला? शिवाय जर का हे पदार्थ काळजीपूर्वक हाताळले नाहीत तर काय अनर्थ ओढवतात याची आपल्याला पूर्ण कल्पना आहेच. एवढंच नव्हे तर हे भयकारी परिणाम आपल्या ग्राहकांनाही नीटपणे समजावेत यासाठी आपण वरचेवर त्यांच्याशी विचारविनिमय नाही का करत?

-२-

रमेश - होय ना. आपल्या संशोधन केंद्राच्या ग्राहकांना आपण छोट्या अवधीचे कोर्सेस पूर्ण करायला लावतो न मगच त्यांना किरणोत्सारी पदार्थ नेऊ देतो. ही कल्पना सर्वांनाच आवडली. त्यामुळे ग्राहकाला सर्व संभाव्य धोक्यांची व परिणामांची आगाऊ कल्पना मिळते तसेच याबाबतचे सर्व गैरसमज तर दूर होतातच पण प्राजीव आत्मविश्वास निर्माण होत नाही. सर्वांनीच या पद्धतीचं कौतुक केलं.

अजय - हं, पण आपल्या शोधनिबंधाचं काय? आणि इतर महत्वाचे पेपर्स कुणाकुणाचे होते?

रमेश - ते तर आता मी सोमवारी आपल्या ग्रुप सेमिनारमध्ये सर्वांनाच तपशीलवार सांगणार आहे. आता एवढंच सांगतो की आपला निबंध सर्वांनाच अतिशय आवडला. त्यावरती खूप चर्चा पण झाली. बरं साहेब, पण मला एक सांगा की मी जर्मनीला जाण्याअगोदर गंगापूरच्या हॉस्पिटलचे काही लोक ट्रेनिंगसाठी आले होते. त्यांना काही पेन्सिलसही यायच्या होत्या, त्यांचं काय झालं?

अजय - हां हां ते साने आणि सुंदरम ना? त्यांचं ट्रेनिंग व्यवस्थित पूर्ण झालं. काल संध्याकाळी ते रेडिओॲक्टिव्ह पेन्सिल्स् घेऊन गेले. आपल्या गोरवल्यांनी व्यवस्थित काळजी घेऊन स्वतः ते जीट पॅक करून दिलंय. एव्हाना ते पोचलेपण असतील. अगोदर रेल्वेनं फर्स्ट क्लासनं जायचं म्हणत होते पण मीच त्यांना रेल्वेनं न जाता मोटारीनं जायला लावलं. शेवटी त्यांनी हॉस्पिटलमधून खास गाडी मागवली आणि मगच आम्ही त्यांना जाऊ दिलं.

रमेश - छान. रेल्वे, बसमधून इतक्या जोखमीच्या वस्तू इतक्या सहप्रवाशांबरोबर नेण्यापेक्षा स्वतंत्र गाडीतून पाठविण्याची कल्पना आवडली मला. बरं साहेब, निघू मी आता?

अजय - होय, प्रवासानं थकला असाल. तुम्हाला भरपूर विश्रांतीची आवश्यकता आहे. छान आराम करा अन् उद्या ताजेतवाने होऊन या. जातांना गोरवल्यांनापण भेटून जा.

-३-

[रमेश सावंत जातात. अजय चक्रवर्तींच्या टेबलावरचा फोन खणखणतो. डॉक्टर अजय रिसीव्हर उचलून बोलू लागतात]

अजय - हॅलो. मी डॉक्टर अजय चक्रवर्ती, रेडिएशन सेफ्टी विभागातून बोलतोय. हॅलो? कोण? जरा मोठ्यानं बोला?, नीट ऐकायला येत नाहीए इकडे. कोण? हॅलो, कोण, डॉक्टर आगाशे? कुठून? गंगापूरहून? काय म्हणताय? व्हॉट? काय? कुठे? केव्हा? काल रात्री? ओ माय गॉड. काय झालं हो हे? मला तर वाटलं मंडळी सुखरूप पोचल्याबद्दल तुमचा फोन असणार. काय म्हणता? पोलिस कमिशनरना कळवलं आहे? ठीक ठीक मी पाहतो. फोन करा मला तातडीनं. हो हो, मी निघतोच आता इथनं. (फोन ठेवतो) अरे बापरे, काय होऊन बसलं हे? ती रेडिओॲक्टिव्ह पेन्सिलींची पेटी? तिचं काय झालं असेल? ओ माय गॉड. गोखले, गोखले, रमेश रमेश.

[दोघेही बाजूच्याच खोलीतून धावत येतात]

गोखले - काय झालं साहेब? अन् आपला चेहरा असा घाबरलेला का बरं दिसतोय?

अजय - तशीच वाईट बातमी आहे. रमेश, गोखले. काल सायंकाळी गंगापूरला गेलेली गाडी तिथं पोचलीच नाही.

रमेश - म्हणजे? काय झालं तरी काय?

अजय - रात्रीच्या अंधारात घाटामध्ये समोरून येणाऱ्या गाडीला चुकविण्याच्या प्रयत्नात गाडी कलंडली अन् खोल दरीत जाऊन पडली.

रमेश - पण आतल्या माणसांचं काय? अन् किरणोत्सारी कांड्यांचं ६ पासिल? बापरे काय झालं हो हे?

अजय - तीच तर काळजी लागलीय मला. आत्ताच डॉक्टर आगाशे फोनवरून बोलले. त्यांनाही अपघाताचा पूर्ण तपशील अजून समजलेला नाहीए. त्यांनी पोलिस कमिशनरना सर्व गोष्टींची कल्पना दिली आहे.

गोखले - बापरे, फारच भयंकर. काल दुपारीच मी स्वतः पॅकिंग केलं व त्या दोघांच्या ताब्यात पेटी दिली. आता काय करायचं साहेब?

रमेश - मला वाटतं आपण ही गोष्ट ताबडतोब जाहीर करायला हवी. रेडियो, टी.व्ही. वरून माहिती सांगून लोकांना सावध करायला हवं. काही भलतंसलतं घडायच्या आत काळजी घेतलेली बरी..

अजय - मला वाटतं रमेश, आपण कमिशनर साहेबांच्या फोनची वाट पाहू या. नेमकं काय घडलंय हे आपल्याला कळायच्या आधीच लोकात घबराट पसरवणं हे काही बरोबर नाही. अर्थात मी आत्ताच डांगरेकरसाहेबांच्या कानावर ही गोष्ट घातली. दरम्यान गोखले, आपल्या बचाव पथकाला सूचना द्या. ट्रान्स्पोर्ट सेक्शनकडून एक जीप अन् एक स्टेशनवॅगन तातडीनं मागवून घ्या. कुठल्याही क्षणी आपल्याला निघावं लागेल. आणि हो, आपली सगळी किरणोत्सार मापक यंत्रं, रेडिएशन मीटर्स बरोबर घ्या.

रमेश - साहेब, मी पण आपल्याबरोबर येणार.

अजय - अरे रमेश, तू आत्ता दमून आला आहेस. तू विश्रांती घे. मी पाहतो सारं.

रमेश - ही वेळ विश्रांतीची नाहीए, आणीबाणीची आहे. मी येणारच.

अजय - ठीक आहे. मी डांगरेकरसाहेबांकडे जाऊन त्यांना सांगून येतो. तू आपल्या हॉस्पिटलमध्ये जा व डॉक्टर नाडकर्णींना भेट. सगळ्या परिस्थितीची नीट कल्पना दे आणि त्यांना तयारीत रहायला सांग. अन् हो, तुझी बहीण - मिसेस नाडकर्णी - त्या ड्यूटीवर असतील का आत्ता?

रमेश - पाहतो. साधनाताई असायला हवीच तिथं. आता चीफ मेट्रन झाल्यापासून बहुतेक वेळ हॉस्पिटलमध्येच असते. तिला आणि डॉक्टरसाहेबांना हॉस्पिटल हे आता दुसरं घरच झालंय.

अजय - ठीक. त्यांनाही कल्पना दे. म्हणावं, तयारीत रहा. अशा प्रकारच्या केसेस आपण अजूनपर्यंत हाताळलेल्या नाहीत. कुठल्याही प्रसंगाला सामोरं जावं लागेल. चला निघू या आता. काय काय वाढून ठेवलंय नशिबात कोण जाणे.

[सर्वजण जातात]

[कँटिनमधील गोंगाट, कोलाहल व या पार्श्वभूमीवरती कर्मचाऱ्यांचं गप्पाष्टक रंगलेलं. कर्वे, नायर, महादेवन व शेट्टी बोलत बसलेत]

<u>कर्वे</u> - हं, काय नायर, काय खबरबात तुमच्या डिपार्टमेंटची. बरीच खळबळ माजून राहिलीय ऐकतो.

<u>नायर</u> - खळबळ कसली घेऊन बसलाय कर्वे, सगळ्यांच्या तोंडाला फेस आलाय फेस. एवढे चिमणीएवढे तोंड करून ओढलेल्या चेहऱ्यानं सुतकातल्यासारखे बसलेत सगळे.

<u>कर्वे</u> - अरे पण असं झालंय तरी काय एवढं? मी तर आत्ता महिनाभराच्या सुट्टीवरून परतलो अन् समजलं की तुमच्या रेडिएशन विभागात भानगड झाली म्हणून. काय झालं रे नेमकं?

<u>नायर</u> - आमच्या साहेबानं रेडिओॲक्टिव्ह पेन्सिली दिल्या गंगापूरच्या हॉस्पिटलला अन् ती पेटी घेऊन जाणारी गाडी कोसळलीय दरीत.

<u>महादेवन</u> - अरे बापरे, मग पुढं काय?

<u>नायर</u> - पुढं काय? आमचा साहेब गेलाय लवाजमा घेऊन अन् तुडवतोय दगडधोंडे काटेकुटे दरीतले.

<u>महादेवन</u> - अरे पण असं कधी झालं नव्हतं इतक्या वर्षांत.

<u>नायर</u> - हो ना. अरे, आमच्या साहेबाला या खेपेलाच काय झालं समजत नाही. नेहमी तर बाहेरगावची माणसं येतात ह्या वस्तू न्यायला. या खेपेला त्यानं आग्रह करकरून गाडी बोलावून घेतलीन पार गंगापूरहून.

<u>महादेवन</u> - त्यानं बिचाऱ्यानं काळजी म्हणून बोलावून घेतली असेल त्याला काय कल्पना एवढं मोठं संकट येईल, अपघात होईल म्हणून.

<u>कर्वे</u> - अरे कसला अपघात घेऊन बसलात, मला तर यात घातपाताचा संशय येतोय. नाहीतर तो साला ड्रायव्हरच टाईट पिऊन गाडी चालवत असेल. आणि ती गाडी तरी कसली रे खटारा. गेटबाहेर पडल्यानंतर बंद पडली म्हणे. दोन माणसं धक्का मारून स्टार्ट करत होती. असली ती धक्का स्टार्ट गाडी असल्यावरती ती दरीत कोसळेल नाहीतर काय?

नायर – हा कर्वे म्हणजे असाच तिरका विचार करणार. अन् तुला कुणी सांगितलं की गाडी ढकलत होते म्हणून. तू स्वतः बघितलंयस का?

कर्वे (वरमून) – नाही म्हणजे आपला तो हा म्हणत होता.

महादेवन – बघ म्हणजे हा आपला देतोय ठोकून मनातल्याच गोष्टी बरं पण पुढं काय झालं? त्यांना काहीतरी बातमी गावला हवी होतीच.

नायर – अरे महादेवन तो बघ शेट्टी धावतच येतोय. नक्कीच त्यानं काहीतरी बातमी आणली असणार.

[शेट्टी धापा टाकतच येतो.]

शेट्टी – सापडली, मंडळी, सापडली, पेटी मिळाली. आताच चक्रवर्ती, रमेश, अजय, गोखले सगळी मंडळी परतली.

नायर – असं, पण कुठे मिळाली पेटी, अन् सुरक्षित होती ना?

शेट्टी – काही नीट समजलं नाही, पण गाडी आली ती थेट हॉस्पिटलपाशीच, मी तिथंच उभा होतो ना, अन् दोसाही गाडीतनं एक काळा माणूस आणला होता, फक्त लंगोटीवर जंगलात राहणारा आदिवासी असावा असं वाटत होतं. जाम घाबरल्यासारखा दिसत होता.

कर्वे – असं. कुठला आहे तो? नाव काय त्याचं? अन् त्याचा ह्याच्याशी काय संबंध?

शेट्टी – काही समजत नाही पण धावपळ मात्र जोरदार चालली होती. जीपमधून उतरतानाच रमेशनं त्याला नावानं हाक मारलेली मात्र मी स्पष्टपणे ऐकली – कालूराम गंगाराम.

नायर, कर्वे, महादेवन – काय कालूराम गंगाराम?

शेट्टी – होय, कालूराम गंगाराम. बस् एवढंच. पुढचं काहीच कळलं नाही. लगबगीनं व्हीलचेअरवर बसवून आतमध्ये नेला त्याला. डामरेकरसाहेब स्वतः, चीफ सिक्युरिटी ऑफिसर पोलिस कमिशनर, डॉक्टर नाडकर्णी, मेट्रन साधनाताई सर्वांचीच लगबग चाललीय. एक आख्खा वॉर्डच रिकामा करून घेतलाय म्हणतात त्याच्यासाठी. सगळ्या हॉस्पिटलभर नुसती धांदल उडालीय सगळ्यांची.

महादेवन – म्हणजे मोठंच जकुडं दिसतंय, काहीतरी. चला, चला गुनिसनच्या ऑफिसात जाऊन नेतेमंडळींच्या कानावरती घालू यात या गोष्टी.

[सगळे जातात]

[डॉक्टर नाडकर्णी यांचे घर. डॉक्टर अजय चक्रवर्ती, रमेश व नाडकर्णी बोलत बसलेत. रमेशची बहीण डॉक्टर नाडकर्णींची पत्नी – साधनाताईपण आहेत]

अजय – हं, मग डॉक्टर, काय म्हणतोय कालूराम गंगाराम? कितपत आशा आहे?

नाडकर्णी – आत्ताच काही सांगणं कठीण आहे. खूपच दमलेला अन् भेदरलेला होता तो आला तेव्हा. तुम्हा हे सगळंच वातावरण त्याला नवीन. तूर्तास झोपेचं इंजेक्शन देऊन त्याला सक्तीची विश्रांती घ्यायला लावलीय.

साधना – विश्रांतीची तर सर्वांनाच गरज आहे. सगळेजण दोन तीन दिवस खपत होते. काल तर ही मंडळी आली तेव्हा रमेशदादा फारच थकून गेलेला दिसत होता. बसल्याजागी झोपला सुद्धा असता.

अजय – हो ना. याची पण कमालच आहे. एवढा लांबचा विमान प्रवास करून आला अन् जराही विश्रांती घ्यायला सवडच मिळाली नाही.

रमेश – गेल्या आठवड्यात कुणी सांगितलं असतं की परतल्यावर तुला डोंगरदऱ्या तुडवायला लागणार आहेत तर मी त्याला वेड्यातच काढलं असतं.

नाडकर्णी – अजय, काल काही स्वस्थपणानं बोलता आलं नाही. आता सांगा पाहू नीट काय घडलं ते.

साधना – दोन तीन दिवसांपासून हॉस्पिटलमध्ये उलटसुलट बातम्या देणारे, चवकशा करणारे इतके लोक येत होते, फोन येत होते की मला तर बाई पार गोंधळल्यासारखंच होऊन गेलंय. नेमकं घडलं तरी काय रे रमेश? अन् तुम्ही या कालूरामापर्यंत पोचलात तरी कसे? मला तर एखादा कादंबरीतलाच रोमहर्षक प्रसंग वाटतोय.

रमेश – त्याचं काम झालं नाई, परंतु आम्ही इथून दुपारचे निघालो ना
ते अपघाताच्या जागी पोचलो तोवर अंधार झाला होता
त्यामुळं दरीत उतरून काही करणं शक्यच नव्हतं. तिथं
ड्यूटीवर असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांकडून समजलं की
गाडी शंभर दीडशे फूट खोल दरीत घरंगळत गेली. सांजे
व ड्रायवर जागीच ठार झाले तर सुंदरम् हॉस्पिटलच्या
वाटेवरती मरण पावला. तिघांचेही मृतदेह अगोदरच पुढे
नेलेले होते.

साधना – पण हा अपघात झाला कसा काय? कुणाचे जाबजबाब झाले
नाहीत काय?

अजय – प्रत्यक्ष घटना पाहणाऱ्या एका धनगराच्या पोराचा जबाब
मिळालाय पोलिसांना. वळणावरून भरधाव वेगानं येणाऱ्या
मालमोटारीला चुकवताना कडेचा संरक्षक कठडा तोडून गाडी
खाली कोसळली म्हणे. सर्व मृतदेहांचे पोस्टमार्टेम पण झालं.
त्यात काहीच आक्षेपार्ह आढळलं नाही.

नाडकर्णी – बरं मग पुढं!

रमेश – त्या दिवशी रात्री घाटमाथ्यावरच्या डाकबंगल्यात रात्र
काढली. चिंतेनं अन् काळजीमुळं झोप अशी कुणालाच येत
नव्हती म्हणा. दुसऱ्या दिवशी सगळीजणं अपघातस्थळी
उपकरणं घेऊन धावलो. आम्ही इथले दहाजण, पोलिसांची
वायरलेस सेट असलेली गाडी अन् पंचवीस पोलिसांची एक
तुकडी. दरीत कोसळलेल्या गाडीचा सांगाडा बघितला अन्
अपघाताच्या भीषणतेची कल्पना आली. आता गाडीतल्या
लोकांचं सामान, अन् मुख्य म्हणजे किरणोत्सारी कांड्या
असलेली पेटी शोधायची मोठीच कामगिरी पार पाडायची
होती. सगळेच कामाला लागलो.

साधना – हे म्हणजे अगदी महासागराच्या तळाशी पडलेली सुई
शोधून काढण्यासारखं अवघड काम.

अजय – काम अवघड तर खरंच पण अशक्य मात्र नाही हं
ताई. अतिशय संवेदनक्षम अशी किरणोत्साराचं मोजमाप
करणारी यंत्र बरोबर नेली होती ना आम्ही.

साधना - अस्सं. किती अंतरावरून ही यंत्रं काम करतात? अन् अगदी नेमकी जागा कशी काय समजते

अजय - सांगतो ना. आम्ही बरोबर नेलेली उपकरणं चालू ठेवीत व दरीत उतरलो. प्रथम तर आमची फारच निराशा झाली कारण मोटारीपाशी काहीच सापडलं नाही. तसेच खाली गेलो. आणखी खाली उतरून गेलो तर कपड्यांची सूटकेस व इतरत्र अस्ताव्यस्त पडलेले कपडे दिसले. आता इथेच जवळपास कुठेतरी पेटी सापडणार म्हणून आम्ही मोठ्या उमेदीने खाली उतरू लागलो पण यंत्रांवर कुठलीच सूचना मिळेना.

रमेश - काय सांगू ताई तुला, वरती उन रणरणत होतं, तहानेनं आम्ही सगळे व्याकूळ झालेलो, तर डोंगर चढून परत जायचं त्राण उरलेलं नव्हतं. खाली दरीत छोट्या ओढ्याला थोडं पाणी जागोजाग दिसत होतं, तिथवर तर जायला हवं होतंच. आम्ही भराभरा खाली उतरून आलो अन् जरा डेरेदार आंब्याच्या झाडाखाली पाणी पिऊन विसावलो.

अजय - आता इतक्या खोलवर पोचल्यावरती आमच्या साऱ्या आशा पार मावळून गेल्या होत्या. सहज चाळा म्हणून मी माझ्या हातातलं यंत्र चालू केलं अन् काय आश्चर्य बीप, बीप, बीप बीप असा अतिशय क्षीणसा आवाज ऐकू येऊ लागला त्या बरोबर सगळेजण ताड्दिशी उठून बसलो.

साधना - म्हणजे किरणोत्साराची सूचना मिळू लागली तर. मग काय मिळाली का पेटी तिथेच जवळपास?

रमेश - नाही तिथंच नाही मिळाली. क्षीणसा इशारा मिळताच सगळेजण उठलो आणि आपापली उपकरणं चालू करून या इशाऱ्याचा मागोवा घेत घेत पुढे निघालो. काही अंतर नदीच्या काठाकाठानं गेल्यावरती यंत्रातून आवाज आणखी मोठ्यानं येऊ लागला अन दूरवर त्या घनदाट जंगलात एकुलती एक झोपडी दिसली.

नाडकर्णी - कमाल आहे, एवढ्या मोठ्या जंगलात एकच खोपट? आजूबाजूला वस्ती अशी नाहीच?

अजय - उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये जनावरांना पाण्याजवळ घेऊन रहावं लागतं. गाईगुरांना पाण्यापाशी न्यायचं काम धनगरी मंडळी करतात. त्यांच्यातल्याच एका धनगराचं झोपडं होतं ते. आजूबाजूला गुरंढोरं पण चरत होतीच. मागाहून समजलं की त्याचे सगेसोयरे व नातलग जवळच्या डोंगरावर रहात होते व गुरांना चारापाण्यासाठी हा रनावती घेऊन आला होता.

साधना - मग मिळाल्या का त्या पेन्सिली त्याच्यापाशी?

रमेश - होय मिळाल्या आम्ही झोपडीपाशी पोचलो तर इतकी माणसं व पोलिस पाहून तो पळायलाच लागला पण आम्ही त्याला पकडून ठेवला, नीट चवकशी केली, समजावून सांगितलं तशी त्यानं झोपडीच्या कुडापाशी लावलेल्या पिशवीकडे बोट दाखवलं. तिथेच त्या पेन्सिली होत्या. आम्ही बरोबर शिसं भरलेला पेटया नेल्या होत्या त्यामध्ये त्या किरणोत्सारी कांडया घालून पेटीबंद करून ठेवल्या. सगळ्याच्या सगळ्या कांडया त्याच्याकडे मिळाल्या तेच हा ठाकूराम गंगाराम.

नाडकर्णी - पण या सगळ्या कांडया त्याच्यापर्यंत पोचल्याच कशा? अन् आपण इथं तर कडेकोट बंदोबस्त करून पेटीत घालून या वस्तू देतो ना ती पेटी कुठं गेली?

रमेश - ती तर फारच विचित्र घटना म्हणायला हवी. अपघात झाला तो दिवस पौर्णिमेचा. गाडी घाटात कोसळली त्या रात्री हा ठाकूराम गंगाराम त्याच ठिकाणाहून डोंगर उतरत होता पण तो होता दारू पिऊन तराट. अन् योगायोग पहा. त्याच्या वाटेवरच ती अवजड पेटी येऊन पडलेली होती. शिसं भरलेलं असल्यानं पेटी चांगलीच जड होती ती काही त्याला उचलवेना. पठ्यानं कमरेच्या कोयत्यानं उघडली. वरचं शिसं दूर केलं. आतल्या कांडया चंद्रकिरणांमुळे चमचमत होत्या. त्यानं पुढचामागचा विचार न करता सरळ कांड्या त्याच्या वरच्या खिशात टाकल्या, अन् झुलत झुलत डोंगर उतरु लागला.

त्याला वाटलं चांगला भाव भेटला. चार पैसे येतील. ही पेटी त्यानं पुन्हा येऊ असा बेत करून त्यानं ती पेटी झुडुपात लपवून ठेवली.

साधना — बापरे किरणोत्सार बाहेर पोहोचू नये म्हणून जाड शिशाच्या वीटा वापरतात ना? अन् यानं तर सरळ त्या पेन्सिली खिशात टाकल्या?

अजय — हो, त्या बिचाऱ्याला परिणामांची काय कल्पना असणार? जरावेळानं छातीपाशी गरम व्हायला लागलं म्हणून त्यानं कांड्या काढून धोतराच्या सोग्यात बांधल्या. झोपडीपाशी येईतो मांड्याही भाजू लागल्या तशी त्यानं काढून पिशवीत ठेवून भिंतीला अडकवून ठेवल्या. आम्ही जाईतो त्यानं पुन्हा काही कांड्यांना हात लावला नव्हता. आम्ही त्याला दादाबाबापुता करून आमच्याबरोबर यायला सांगितलं पण तो तयारच होईना काही केल्या. शेवटी पोलिसांनी दम भरल्यावरती कुत्र्यासारखा सरळ आला. येताना त्यानं झुडुपात लपवून ठेवलेली पेटीपण काढून दिली. मग आमची सगळी वरात तो डोंगर चढून वरती आली तोवर संध्याकाळ झाली होती. मग लगेचच आम्ही इकडे निघून आलो.

साधना — म्हणजे या काळूरामच्या अंगात बराच किरणोत्सार शिरला असाना. काय काय परिणाम होऊ शकतील याचे डॉक्टर?

नाडकर्णी — ते त्याला किती डोस मिळालाय व या किरणोत्साराचा त्याच्या शरीरात किती खोलवर प्रवेश झालाय त्याच्यावरती अवलंबून राहील. अशा प्रकारची तीव्र मात्रा मिळालेला पेशंट अजूनपर्यंत तरी आपल्याकडे आढळलेला नाहिए. आपल्या सर्वांनाच यातून बरंच काही अनुभवायला शिकायला मिळणार आहे.

रमेश — पण डॉक्टर या अशिक्षित अडाणी माणसाला सोसवेल का हे सारं? त्याला कळेल का त्याला नेमकं काय होतंय ते? त्यातून शहर व इथलं वातावरण त्याला नवीनच आहे.

नाडकर्णी - त्याची काळजी नको. ती जबाबदारी साधनाची. अडाण्यातल्या अडाणी माणसाला जरी कसा द्यायचा, त्याला औषधोपचार करून घेण्यासाठी तयार कसं करायचं हे तिच्याकडून शिकून घ्यावं. काय ग, तयार आहेस ना?

साधना - या केसमध्ये माझी कसोटी लागणार आहे खरी पण तरीदेखील माझ्याकडून मी जास्तीत जास्त प्रयत्न करणार आहे.

नाडकर्णी - आणखी एक महत्त्वाची गोष्ट. या केसबाबतच्या सर्व फाईल्स, रिपोर्टस हे अगदी गुप्त ठेवले जातील हे पाहिलं पाहिजे. कुठल्याही प्रकारच्या अफवांना, गप्पांना वाव मिळता कामा नये.

रमेश - आता लोक आपल्यालाच सर्वांनाच भंडावून सोडतील हे नक्की. काय सांगायचं तरी काय त्यांना? नशीब एवढंच की परवाच्या वर्तमानपत्रात अपघाताची बातमी छापून आली त्यात या किरणोत्सारी धोक्यांविषयी काही माहिती नव्हती.

अजय - त्याचं श्रेय गंगापूर हॉस्पिटलचे डॉक्टर आगाशे व पोलिस कमिशनर यांना द्यायला हवं. अर्थात ही बातमी आपण समजतो तितकी गुप्त राहणं कठीण आहे. एकदोन दिवसांतच फोन खणखणू लागतील, घरी, ऑफिसात सगळीकडूनच प्रश्न, प्रश्न आणि प्रश्न विचारले जातील.

नाडकर्णी - त्याला काही इलाज नाही, पण खंबीरपणानं माहित नाही, ही गोपनीय गोष्ट आहे असं सांगायला शिका. मुख्य म्हणजे प्रचारमाध्यमांना दूर ठेवा. इकडची हॉस्पिटल ची आघाडी मी व साधना सांभाळतो. आपण आपल्या परीनं प्रयत्नांची पराकाष्ठा करु या. साधना, केंद्राच्या ग्रंथालयातून या विषयावरची पुस्तकं, मासिकं व अहवाल मागवून घे. पुन्हा एकदा नव्यानं अभ्यासाला सुरुवात करायला हवी.

[फोन खणखणतो, डॉक्टर नाडकर्णी घेतात]

हॅलो, डॉक्टर नाडकर्णी बोलतोय. काय? कालुराम व्हायोलेंट झालाय? आवरत नाहीए? अपकून आम्ही प्रयत्न करतोय!

ठीक आहे. हॅलो. त्याला चवथ्या मजल्यावरच्या कोपऱ्यातल्या खोलीत घेऊन चला. सिक्युरिटी गार्ड्सना बोलवा. होय होय. आम्ही निघतोच आहोत. पाचेक मिनिटात पोचतो. आणखी एक झोपेचं इंजेक्शन द्या त्याला. ताबडतोब. (फोन ठेवतात) ओ माय गॉड. ही केस कठीण दिसते. चला साधना, रमेश, अजय आपल्याला निघायला हवं.

(जातात)

[अजय चक्रवर्ती यांची प्रयोगशाळा. गोरखले, कर्वे व नायर बोलत बसले आहेत.]

कर्वे — हं. मग काय गोरखलेसाहेब, आता कोणत्या हॉस्पिटलची ऑर्डर घेतलीय अं? किरणोत्सारी काड्या पुरवायची हो?

नायर — हा कर्वे म्हणजे असाच कुजका माणूस आहे. तुला काय सरळ बोलायला येतच नाही का रे?

कर्वे — आता यात काय वाकडं बोललो रे मी? आपली सहज चवकशी केली. लायब्ररीत चाललो होतो, म्हटलं जाता जाता डोकावून जावं.

नायर — हं: म्हणे सहज चवकशी करायला आलो होतो. अरे, मग कर ना खरी चवकशी काय करायचीय ती! तुला हेच विचारायचंय ना गोरखलेसाहेबांना की हा अपघात नेमका कसा काय झाला आणि तो आदिवासी माणूस इथे आपल्या हॉस्पिटलमध्ये कशासाठी आणलाय?

गोरखले — हे पहा कर्वे, त्याची उत्तरेही तुम्हाला माहिती आहेत, मग परत माझ्या तोंडून कशाला वदवून घेताय?

कर्वे — अहो माणसाला कुतूहल उत्सुकता असतेच की नाही खरं काय ते जाणून घ्यायची? अन तुमच्याकडे म्हणजे अगदी फर्स्ट हँड इन्फर्मेशन — ताजी बातमी काय? त्यातनं हा तर अघोरीच प्रकार. प्राण्यांवरचं बेतायचं की लपवायचा.

गोरखले — अहो तसं या जगात कुणालाच कोणतीच गोष्ट ठेवली नाही. अवघ्या मनुष्यजातीचा इतिहास बघितलात तर असं आढळेल की चुकतमाकत, संकटांना तोंड देत देतच तो शिकत आलाय. अपघात हे होतच असतात, प्रसंगी प्राणहानी पण होते; पण हीच व अशीच खडतर अशी प्रगतीची वाटचाल आहे.

कर्वे - बघा आपण किती सोपी गोष्ट विचारली ह्यांना अन् हे वागले आपल्याला तत्वज्ञान आणि इतिहास शिकवायला.

गोखले - तसं नाही हो, माझं म्हणणं इतकंच की अपघातानं खचून न जाता माघार घेणं योग्य नाही. पुन्हा असा चुका होणारच नाहीत याचीच जास्तीत जास्त काळजी आपण सगळ्यांनी घ्यायला हवी.

नायर - ते खरं गोखलेसाहेब, निसर्गाच्या प्रकोपापुढं कुणाचंच काहीच चालत नाही, पण माणसंच जर ताळतंत्र सोडून वागायला लागली तर?

गोखले - म्हणजे काय नायर? मला समजलं नाही तुला काय म्हणायचंय ते! स्पष्टच सांगना.

नायर - म्हणजे असं की आज किरणोत्सारी पदार्थ चुकून किंवा अपघातानेही जरी एखाद्यानं हाताळला तरी त्याचे परिणाम त्याला आयुष्यभर भोगावे लागतील हे तर आपल्याला ठाऊकच आहे.

गोखले - बरं मग, पुढे!

नायर - पण समजा उद्या एखाद्या विकृत डोक्याच्या हुकुमशहानं ठरवलं की या किरणोत्सारी पदार्थांच्या बारीकबारीक गोळ्या बनवून विमानातून शत्रूच्या प्रदेशात विखरून टाकायच्या तर काय होईल? तिथल्या वनस्पती व प्राणीजीवनाचा हळूहळू पण निश्चितपणे नाश होऊन जाईल. या हळूहळू भिनत जाणाऱ्या विषानं पुढच्या अनेक पिढ्या विकृती घेऊनच जन्माला येतील.

गोखले - अरे उद्याची बात कशाला करतोस, आजच आपल्या भवती काय चाललं आहे ते पहा ना. शस्त्रास्त्रांचे, क्षेपणास्त्रांचे साठे रासायनिक वायू, रसायनांचा वापर, अणुबॉंब, न्यूट्रॉन आणि हायड्रोजन बॉंबस् हे आधुनिक विज्ञानानं निर्माण केलेले अनेक भस्मासूर आजच्या सेनेसाठी हजर आहेत.

कर्वे - अन् बाटलीत बंद करून ठेवलेला हा भस्मासूर बाहेर पडला की त्यातनं नागासाकी/हिरोशिमा सारखा महाभयंकर प्रकार घडतो अन् मोठ्या प्रमाणावरती ~~निष्प~~ विध्वंस होतो.

नायर - पण हा भस्मासूर बाटलीतच बंद करून ठेवायचा की त्याचा मोकाट सोडायचा याचा विचार आणि निर्णय कुणी करायचा ? त्याची निर्मिती करणाऱ्यांनी की त्याचा वापर करणाऱ्यांनी ?

गोखले - त्याचं असं आहे नायर, विज्ञान तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं नवनवीन शोध लावून माणसाचं जीवन अधिकाधिक सोयींनी, सुविधांनी संपन्न करायचं हे खऱ्याखुऱ्या शास्त्रज्ञाचं, तंत्रज्ञाचं उद्दिष्ट. या शोधांचा योग्य तो वापर करून अवघ्या मानवजातीला त्याचा लाभ मिळवून देणं हे खऱ्याखुऱ्या शासनकर्त्यांचं कर्तव्यच आहे.

नायर - पण तुम्ही म्हणता तसे 'खरेखुरे' आदर्श वैज्ञानिक व शासक निपजलेच नाहीत तर वेगानं सर्वनाशाकडं जाणं अटळच नाही का ?

गोखले - शास्त्रज्ञाचं व तंत्रज्ञाचं काम तलवार बनवून द्यायचं आहे मग त्यानं फळ कापायचं की मुंडकं उडवायचं हा त्याच्या अखत्यारीतला प्रश्न नाही.

कर्वे - छान म्हणजे हा अंग झटकून टाकायचा, जबाबदारी टाळायचा चांगला मार्ग आहे म्हणायचा.

गोखले - यात जबाबदारी झटकायचा प्रश्न येतोच कुठे ? प्रत्येक शोधाचे कितीतरी विधायक उपयोग आहेतच व त्यांचाही मोठ्याच प्रमाणावरती उपयोग करून घेतला जातो आहेच की. मात्र एखाद्या राष्ट्राकडून क्वचित कधी त्याचा गैरवापर होत असेलही.

कर्वे - पण असा गैरवापर होत असताना त्याचा निषेध करायला तुम्ही पुढे येणार आहात का हा खरा प्रश्न आहे. की बसणार जाऊन आपापल्या हस्तिदंती मनोऱ्यांमध्ये ?

गोखले - हो तर, का नाही ? आज जगभर अण्वस्त्रे, क्षेपणास्त्रे यांची निर्मिती व प्रचंड साठे ही सर्वांच्याच चिंतेची गोष्ट बनलेली आहे. त्याविरुद्ध परदेशांत ठिकठिकाणी आवाजही उठवले जात आहेत; आणि त्यामध्ये सामान्य नागरिकच नव्हे तर शास्त्रज्ञ, तंत्रज्ञही हिरिरीनं भाग घेत आहेत.

कर्वे - परदेशांचं सोडा हो, आपल्याकडे काय परिस्थिती आहे ? आँ ! आपल्या केंद्रात एवढी गंभीर घटना होऊन गेली

पण त्यावर तुम्ही लोक मोकळेपणानं बोलायला पण तयार नाही. सगळं कसं गुप्त अन् गुळमुळीत. तुम्ही कसले कुणाकाचो निषेध करणार?

गोरखले — हे पहा कर्वे ही गोष्ट काही कुणी जाणूनबुजून मुद्दामहून केलेली नव्हती. अहो हा एक अपघात आहे. आणि ही काही मोठी भूषणास्पद गोष्ट नाही की जिला आपण प्रसिद्धी द्यावी. जगजाहिर करावी अशी ही घटना नाही.

कर्वे — नका करू ना, मुळीच करू नका. सामान्य लोकांना अजिबात विश्वासात घेऊ नका, पण निदान या केंद्रात काम करणाऱ्या लोकांना तरी खरी परिस्थिती काय आहे ते कळू द्या, म्हणजे ती निनाकारण घबराट उडालीय, अन् अफवांचं जे उदंड पीक आलंय ते तरी जरा आटोक्यात राहील.

गोरखले — हे पहा कर्वे या गोष्टी काही माझ्या एकट्याच्या मुळीच आवाक्यातल्या नाहीत.

नागर — ते तर खरंच आणि गोरखलेसाहेब, तुम्हाला एकट्याला कोणीच दोषी ठरवत नाहीए. या गोष्टीवरती एकत्रच विचार व्हायला हवा. कालच मला शेट्टी भेटला होता. तो सांगत होता की युनियनवाल्यांनी डायरेक्टरसाहेबांना ताबडतोब सविस्तर निवेदन करायला सांगितलंय.

कर्वे — अस्सं! मग काय झालं? जागल्या वारणाच्या अक्षतांनी!

नागर — नाही. शेट्टी सांगत होता की डायरेक्टरसाहेबांनी थोडंसं थांबायला सांगितलंय. कारण अजून सर्वच गोष्टींचा उलगडा झालेला नाहीए. चौकशी पूर्ण झाली की मी आपणहून निवेदन करीन असं आश्वासन दिलंय यांनी.

कर्वे — निवेदन केलं तर बरंच आहे पण गोपनीयतेचं आणि सुरक्षिततेचं कारण सांगून टाळाटाळच करतील बघा.

गोरखले — जाऊ द्या नाग काय होतंय ते. अरे बोलण्याच्या नादात किती वेळ निघून गेला पहा. चला चहा तरी घेऊन येऊ या. चला.

[जातात]

[रमेश, साधना डॉक्टर नाडकर्णी यांच्या बंगल्यात बोलत बसले आहेत]

रमेश – साधनाताई, ए साधनाताई, हे काय! अशी अंधारात काय बसली आहेस? उठून दिला नाही का जेवायचा? अं? कसला एवढा विचार चाललाय? तुला बरं वाटत नाही का?

साधना – कालूरामचाच विचार करत होते. तो आल्यापासून तर हॉस्पिटलच्या स्टाफ फारच विचित्र वागतोय. माझी तर रात्रीची झोपच कमी झालीय.

रमेश – अस्सं? का बरं? हा इतर रोग्यांहून वेगळ्या प्रकारचा आहे म्हणून का?

साधना – ते तर कारण आहेच पण त्याला आता दोन महिने झाले इथं येऊन आणि त्याला ज्या दिव्यातून जावं लागलंय ते पाहून वेदना होतात. वाटतं या सगळ्यामध्ये त्याचा बिचाऱ्याचा काय दोष? का म्हणून त्याला हे सगळं भोगायला लागावं?

रमेश – पण आता तो पूर्वीपेक्षा बराच सुधारलाय आणि सगळ्यांशी मिळून मिसळून वागतो ना?

साधना – सुरुवातीचे दिवस आठवले की अजूनही गलबलून येतं. त्या बिचाऱ्यानं आत्तापर्यंत कधीच ही दुनिया बघितलेलीच नाही. पहिले कित्येक दिवस तो कुणाशी बोलायला पण मनापासून तयार नसायचा. नाईलाजानंच एखादा शब्द बोलला तर बोलला. त्याला संडास बाथरूमची आतून कडी कशी लावायची इथपासून सगळं शिकवावं लागलं.

रमेश – त्या सुरुवातीच्या काळात त्यानं खूपच त्रास दिला ना?

साधना – हो ना. त्या दिवशी आपण बोलत असताना फोन आला होता ना? त्यावेळी तो कुणालाच आवरत नव्हता. गुरासारखा ओरडत होता अन् हॉस्पिटलच्या व्हरांड्यात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत ओरडत धावत होता. सारं हॉस्पिटल त्यानं अगदी डोक्यावरती घेतलं. चारचार वॉर्डबॉईज त्याला धरून ठेवायला पहात होते पण त्यांना झुकांड्या देऊन हा पळुन बंद दरवाज्यांवरून धावत होता, धडका मारत होता. त्याला इथं मुळी रहायचंच नव्हतं.

रमेश – पण का? इथल्या इतकी सुंदर व अद्ययावत वैद्यकीय सेवा आणखी कुठं मिळणार?

साधना – हे आजच्याला समजतं पण त्याला कसं कळावं? मी जेव्हा डॉक्टर तिथं पोचले तेव्हा त्याला एका खोलीत कोंडून घातलेलं होतं. मी दार उघडायचा लावलं तर एका कोपऱ्यात बसून गुडघ्यात मान घालून बसला होता. दबलेल्या आवाजात हुंदके देत होता. तो जरा शांत झाल्यावर मी चवकशी केली, वॉर्डात विचारलं तर समजलं की त्याला कुणीतरी सांगितलं होतं की उद्या तुला आडवा-उभा फाडणार आहेत म्हणून.

रमेश – ओ माय गॉड. असली अघोरी अन् जीवघेणी थट्टा? मग त्याला सगळ्या रोग्यांपासून वेगळा ठेवलास ना?

साधना – अरे वेड्या, त्यानं प्रश्न सुटेल की गुंता वाढेल? कुणाकुणापासून जपवणार त्याला आपण? शेवटी मी त्या वॉर्डातल्या सर्व वॉर्डबॉईज, नर्सेस, आया यांची बैठक घेतली अन् त्यांना नीट समजावून सांगितलं की या रोग्याला आपण नीटपणे समजावून घेऊ या. हा दुर्दैवी जीव आपल्याला जगवायचाय. त्याला समजेल अशा भाषेत इथल्या सर्व गोष्टींची माहिती करून देऊ या. त्याचं दुःख आपण वाटून घेऊ या.

रमेश – पण या बैठकीचा काही परिणाम झाला का?

साधना – लगेचच नाही झाला. पण काबूरामवर उपचार सुरू झाले एका मागोमाग एक शस्त्रक्रिया होऊ लागल्या तेव्हा मात्र स्टाफच्या वागणुकीत हळूहळू फरक पडायला लागला. आता तर तो त्यांच्या कुटुंबियांपैकीच एक झालाय.

रमेश – पण आता तो पूर्ण बरा झालाय का?

साधना – तसं नाही म्हणता यायचं, पण त्याच्यावरचा धोका टळलाय असं वाटतंय खरं. आत्तापर्यंत त्याच्यावरती दहा शस्त्रक्रिया कराव्या लागल्या. छातीपाशी / मांडीपाशी किरणोत्साराची जास्तच बाधा झाली होती. त्या जागी शस्त्रक्रिया करावी लागली. त्या जागी शरीराच्या इतर भागातली कातडी काढून लावावी लागली.

रमेश – म्हणजे शरीराच्या इतर भागालाही किरणोत्साराची बाधा झालीय वाटतं?

साधना – शब्दांना नावारता येत नाही. आणखी कितीतरी त्याची शस्त्रक्रिया करावी लागेल तेही सांगता येत नाही. शिवाय त्यानं अजूनपर्यंत कधीच इतकी औषधं खाल्लेली नाहीत इंजेक्शन्स घेतलेली नाहीत. त्यांचाही शरीरावरती काही परिणाम होऊ शकतो.

रमेश – खरंच हे माणसाचं शरीर म्हणजे एक अद्‌भुत रसायन आहे. इतकं सारं सहन करायची ताकद येते तरी कुठून?

[डॉक्टर बाहेरूनी प्रवेश करतात]

डॉक्टर – येते बरं. याहूनही भीषण परिस्थितीत माणसं चिवटपणे झुंज देतात. तुला आश्चर्य वाटेल रमेश पण काळूरामच्या या सहनशक्तीचं रहस्य कशात आहे, ठाऊक आहे तुला?

रमेश – नाही बुवा.

डॉक्टर – परवाच मलाही समजलं त्याच्याशी बोलताना. त्याच्या जंगलामध्ये कालभैरवाचं एक प्राचीन मंदिर आहे. त्या देवाचीच आपल्या हातून काहीतरी आगळीक घडली असावी असा त्याचा ग्रह झालाय व या यातना सहन केल्याशिवाय त्या महादेवाचा कोप काही नाहीसा व्हायचा नाही अशी त्याची प्रगाढ श्रद्धा आहे.

साधना – पहा! कोणती गोष्ट माणसाला सहनशक्ती देईल ते सांगता येत नाही.

रमेश – पण का हो डॉक्टर, या काळूरामचे कोणी नातेवाईक नाही काय?

डॉक्टर – आहेत ना. गेल्याच आठवड्यात त्याचा भाऊ व पुतण्या आले होते. आईवडील लहानपणीच वारले त्याच्या. माझ्याशी भेटून बोलून गेले. आपल्या स्टाफनं त्यांचा उत्तम पाहुणचार केला. जसे नातलगच ते त्यांचे. वर्गणी काढून गाडीभाड्याकरता पैसे पण दिले. पुढच्या खेपेला त्याच्या बायकोला घेऊन यायचेत.

रमेश – म्हणजे याचं लग्नपण झालंय का?

डॉक्टर – ती तर फारच करुण कहाणी आहे. हा अपघात व्हायच्या दोन महिनेच आधी यांचं लग्न झालं होतं अन्

अन् बायको सणाला म्हणून माहेरी गेली होती ती एवढ्यातच परत यायची होती.

<u>रमेश</u> - मला तर त्या मुलीच्या भवितव्याची काळजी वाटते. आणि यांना आता मुलंबाळं झाली म्हणजे मग ?

<u>डॉक्टर</u> - गेल्या आठवड्यातच त्याची नसबंदीची शस्त्रक्रिया केलीय आम्ही. विकृती घेऊन मूल जन्माला येण्याची शक्यता जास्त असते.

<u>रमेश</u> - काय ? मग त्याची काय प्रतिक्रिया ?

<u>साधना</u> - प्रथम त्याला काही समजलंच नाही पण नीट समजावून सांगितलं तशी एकटक समोरच्या भिंतीवरच्या तान्ह्या बाळाच्या कॅलेंडरकडे ~~एकटक~~ पहात राहिला. कालभैरवाची मर्जी एवढंच पुटपुटत होता.

<u>रमेश</u> — अरेरे, बिचारा कालूराम, अजून कायकाय भोगायचंय त्याला !

<u>डॉक्टर</u> - ते तू जाऊन तुझ्या डॉक्टर अजय चक्रवर्तींना अन् ह्या केंद्राच्या डायरेक्टरसाहेबांना जाऊन विचार.

<u>रमेश</u> - पण डॉक्टर, कालूरामचं भवितव्य काय ?

<u>डॉक्टर</u> - ते मलाही आज सांगता यायचं नाही. अशा प्रकारचा गंभीर अपघात आपल्या इथं अजूनपर्यंत घडलेला नाहीए. किरणोत्सर्गाची बाधा ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावरती झालेली होती अशा सर्व जागा हुडकून काढून शक्य तेवढे सर्व उपचार मी केलेत पण आणखी खोलवर बाधा झाली असेल व त्याचा अतिशय सावकाशपणे परिणाम होत असेल तर ते आज लगेचच लक्षात यायचं नाही. शिवाय या क्षेत्रात मी नवीन आहे. या रुग्णाच्या निमित्तानं मी कितीतरी नवीन गोष्टी शिकतोय, अनुभवतोय.

<u>साधना</u> - त्यासाठी कितीतरी संदर्भग्रंथ, नियतकालिकं वेळ मिळेल तेव्हा वाचत असतात. नेहमीच्या रुटीन केसेस हाताखालच्या ज्युनियर डॉक्टर्सना केव्हाच देऊन टाकल्या आहेत. आपल्या लायब्ररीयनला काही नवीन नियतकालिकंही घ्यायला लावलीयत यांनी.

<u>डॉक्टर</u> - तुला माहितीय रमेश की अणुवीजनिर्मिती, वैद्यकशास्त्रं व अण्वस्त्रं बनवण्याच्या कामी किरणोत्सारी पदार्थांचा

वापर व हाताळणी आज जवळजवळ प्रत्येक घोरमामोठ्या राष्ट्रामध्ये होते आहे. अशावेळी निष्काळजीपणा, गलथानपणा बेजबाबदारपणा किंवा अपघात यामुळं व्यंगं निर्माण होतात विकृती तयार होते किंवा प्रसंगी प्राणहानीदेखील होते. याविषयीचा, अशा घटनांचा तपशील किंवा एखादी नवीन आढळून आलेली गोष्ट या विषयाला वाहिलेलं एक मासिक अमेरिकेहून प्रसिद्ध होतं. त्यांच्यातर्फे एक कॉन्फरन्स येत्या डिसेंबरमध्ये अमेरिकेत आहे. त्यासाठी काबूरामच्या केस बाबत काही निष्कर्ष मी काढवेत व त्यावर मी एक पेपर पाठवलाय. पाहू यात हा शोधनिबंध निवडला जातो आहे का!

रमेश – वाः हे तर माझ्या डोक्यात पण नव्हतं. धान, म्हणजे आमंत्रण मिळालं तर साधनाताई अन् तुम्ही दोघंजण अमेरिकेला जाणार तर. धान. धान.

डॉक्टर – या झाल्या नंतरच्या पुढच्या गोष्टी. मला तर काळजी लागून राहिली आहे ती या काबूरामचं पुढं करायचं तरी काय याची. कारण त्याचा हा विकार काही बरा होण्यातला नाही. केव्हाही उफाळून येऊ शकेल व काहीपण घडू शकेल.

[फोन खणखणतो]

हॅलो ! कोण ? हो. हो. मी डॉक्टर नाडकर्णी बोलतोय. काय ? ओ. के. ठीक ठीक. मी पाठवतो त्यांना. आम्ही लगेच निघतोच आहोत.

साधना – (घाबरून) काय झालं ! काबूराम ठीक आहे ना ?

डॉक्टर – नाही तो ठीक आहे. त्याचा चुलत भाऊ आलाय. त्याच्या बरोबर काबूरामची बायको पण आली आहे. दोघांनी रडून ओरडून वॉर्डात आकांत मांडलाय. कशी समजूत घालायची त्या मुलीची! साधना तूही चल माझ्याबरोबर. आज खरी कसोटी लागणार आहे तुझी. रमेश गाडी काढ जरा बाहेर, अन हो एकदा तुझ्या साहेबांना – डॉक्टर अजय चक्रवर्तींना मला भेटून जायला सांग. जमा लवकर. आपल्याला लवकर जायला हवं.

[सगळे जातात.]

[डॉक्टर अजय चक्रवर्ती यांची प्रयोगशाळा. नायर व गोखले बोलत बसले आहेत.]

गोखले — हं, काय मग नायर, कशी काय झाली बाबा तुझी सुटी? केव्हा परत आलास?

नायर — हा काय परवाच्याच दिवशी परतलो. आता मुलांची शाळा सुरू होईल ना पुढच्या आठवड्यात. बरं साहेब, महिनाभरात इकडची काय खबरबात?

गोखले — कसली खबरबात? काही विशेष काही नाही.

कर्वे — (प्रवेश करत) विशेष नाही कसं? अन् हे गोखलेसाहेब काय तुला खबरबात सांगणार?

नायर — काय कर्वे, काही सनसनाटी बातमी सांगणार वाटतं?

कर्वे — अरे, परवाच युनियनच्या कार्यकर्त्यांची विशेष बैठक बोलावली होती, ठाऊक आहे तुम्हाला?

नायर — अस्सं? काय विषय कोणता होता? अन् जमले होते कितीजण?

कर्वे — नाही फारसे लोक जमले नव्हते कारण बैठक तशी मोजक्याच निमंत्रितांसाठी होती. हां, पण मी मात्र गेलो होतो हां.

~~नायर — काय रे कर्वे नाही तुम्ही~~

गोखले — नाही, तुम्ही जाणारच म्हणा, पण इतक्या गुप्तपणे का बरं घेतली होती ही बैठक?

नायर — काय रे कर्वे, युनियनच्या बैठका अशा गुप्तपणे कधी पासून व्हायला लागल्या?

कर्वे — नाही तुम्ही म्हणता ते खरं आहे, पण ही तशी निवडक कार्यकर्त्यांची बैठक होती - या कालूरामच्या संदर्भात.

गोखले — काय, झालं तरी काय तुमच्या बैठकीमध्ये?

कर्वे — नाही, तसं ते अजून गुपित आहे. इतक्यातच सांगायचं नाहीए कुणाला.

नायर — अरे पण थोडंसं तरी काहीतरी सांगशील की नाही? गुप्त भाग तेवढा नको सांगूस हां? निदान बैठकीत कोणकोण बोललं ते तरी सांगशील की नाही?

कर्वे — सांगतो. सांगतो. तुमच्यापासून काय लपवायचं? पण मी सांगितलं असं सांगू नका हं कुणालाही.

नायर - नाही सांगत बाबा, कुणाला सांगत नाही. बोल लवकर. कोण कोण बोलवं ?

कुर्वे - अहो पुष्कळ कार्यकर्ते बोलले. शेट्टी, महादेवन, ह्यांच्या तर मी सुद्धा बोललो.

गोरवले - अस्सं ? तुम्ही कोणते विचार मांडलेत ?

कुर्वे - अहो आपल्या युनियनचे अध्यक्ष अरुणकुमार - त्यांनी सर्वांना मोकळेपणी विचार मांडायला सांगितले. मी ठणठणून सांगितलं की ही नसती पीडा इथं नको. आता झालाय ना ठिकठाक मग हाकलून काढा या कालूरामाला.

गोरवले - (उपहासाने) वाः वाः काम पण नामी उपाययोजना सुचवलीत सुरेख हं. छान. छान.

नायर - पण आणखी कोणकोण बोलले ? काय बोलले ?

कुर्वे - या विषयावरती गप्प बसणं हे कुणालाच पटलं नाही. हा प्रत्येकाच्या अगदी जीवनमरणाचाच प्रश्न आहे. त्यामुळे या विषयावरती ताबडतोब अन् जोरदार आवाज उठवला पाहिजे असं प्रत्येकाचंच म्हणणं पडलं.

नायर - म्हणजे नेमकं काय करायचं ?

कुर्वे - म्हणजे महादेवन म्हणाला की आपण ताबडतोब पत्रकार परिषद बोलावली पाहिजे. या केंद्राच्या बेलगाम, गलथान अन् बेजबाबदार कारभाराचा जाहीर पंचनामा व्हायला हवा. शेट्टी म्हणाला की हा आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. या प्रश्नावरती आंदोलन उभारलं पाहिजे, उपोषण केलं पाहिजे.

गोरवले - मग तुमचे अध्यक्ष महाराज ? ते काय म्हणाले ?

कुर्वे - अरुण कुमार म्हणाले की सुरक्षितता व त्याबाबतची सर्व उपाययोजना ही महत्वाची गोष्ट तर खरीच पण या दुर्दैवी घटनेचा फारसा गलगला होता कामा नये कारण हा आपणा सर्वांइतकाच या केंद्राच्या अब्रूचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न आहे.

गोरवले - अरे वा. या युनियनच्या लीडरमंडळींना केंद्राच्या मॅनेजमेंटचा इतका पुळका कधीपासून येऊ लागला !

कुर्वे- अहो गोरखलेसाहेब, खरी मेख तर पुढेच आहे. ते म्हणाले की या घटनेचा आपण कर्मचाऱ्यांच्या भल्यासाठी उपयोग करून घेऊ या.

नायर - तो कसा काय बुवा?

कुर्वे - अहो पाचेक वर्षांपूर्वी राहीनगरला ती वायुगळतीची फार भयंकर दुर्घटना घडलेली आठवते का? किती माणसं मरण पावली होती! किती कायमची जायबंदी झाली होती!

नायर - हो आठवतेय तर. पण तिचा इथं काय संबंध?

कुर्वे- अहो त्यावेळी युनियनने मागणी केली नव्हती का की ~~सर्व~~ केंद्रातर्फे प्रत्येक कर्मचाऱ्याचा विमा उतरवला जावा म्हणून.

नायर - हो पण त्यावेळी ती मागणी तर साफ फेटाळून लावली होती ना!

कुर्वे - त्यावेळी काय म्हणाले होते डायरेक्टरसाहेब? की आमच्या इथं असे अपघात होणारच नाहीत. आता घ्या म्हणावं. नुसता अपघातच नव्हे तर त्या बिचाऱ्याचं आयुष्यच बरबाद झालं की हो.

गोरखले - अच्छा, म्हणजे कालूरामाच्या अपघाताचं निमित्त पुढं करून तुमची युनियन कामगारांना गटविमा योजनेचा लाभ मिळवून देणार तर!

नायर - पण समजा मॅनेजमेंटनं नाहीच ऐकलं तर?

कुर्वे- अरे नायरभाई, यावेळी आता हुकुमाची पानं युनियनच्या हातात आहेत. या केसची वर्तमानपत्रांतून बोंबाबोंब झाली तर केंद्राला हे प्रकरण केवढ्यात पडेल? गाशा गुंडाळायला लागेल म्हटलं.

गोरखले- म्हणजे मॅनेजमेंटच्या अगतिकतेचा तुम्ही फायदा उठवणार तर! हे एक प्रकारचं ब्लॅकमेलिंगच म्हणायचं.

कुर्वे (संतापून)- हे मात्र फारच झालं हां गोरखलेसाहेब. सुरक्षित वातावरणाची व सुरक्षिततेची मागणी करणं हा काय गुन्हा आहे काय? अन् यात फक्त युनियनच्याच सभासदांचा नव्हे तर तुमच्यासारख्या सभासद नसलेल्यांचापण विमा उतरवला जाणार आहे हे नीट लक्षात असू द्या.

गोरवले - बरं बुवा कर्वे, शब्द चुकला आमचा. मागे घेतो. पण रागावू नका बुवा.

नायर - सर्व कर्मचाऱ्यांचा फायदा जरूर होईल, पण त्या बिचाऱ्या कालूरामाचं काय? त्याच्या अपघाताचं निमित्त झालं अन् अनेकांचे अनेक प्रकारचे फायदे झाले.

कर्वे - आता बोलू नये पण बोलावं लागतंय. कामगारांनी अगदी एकजुटीनं एखादी मागणी मान्य करून घ्यायचं ठरवलं की हे मॅनेजमेंटचे लोक आमच्या नावानं कडाकडा बोटं मोडतात पण यांची स्वतःची वागणूक बघा.

नायर - का? काय झालं?

कर्वे - आता ते डॉक्टर नाडकर्णी, कालूरामावरचा शोधनिबंध वाचायला जाऊन आले ना अमेरिकेला अन् तेही सपत्नीक! परवाच नॉर्डबॉय मला सांगत होता की डॉक्टरसाहेब कालूरामला त्यांचा परदेशी नियतकालिकात छापून आलेला फोटो दाखवत होते.

गोरवले - अहो कर्वे, तो त्यांच्या कामाचा, अभ्यासाचा एक भाग आहे त्यांच्या अनुभवावरून अशा प्रकारच्या इतर रोग्यांवरती काय उपचार करावेत याची माहिती इतरांना मिळणार आहे. हे तर खरं ना.

कर्वे - मिळू द्या ना. आम्ही कुठं जळतोय त्यांच्यावरती. उद्याला डॉक्टर अजय व रमेशनं पण या केसचं भांडवल करून एखादी परदेशवारी पदरात पाडून घेतली तर आमचं काही ना नाही.

नायर - थोडक्यात म्हणजे आपण सारे एकाच माळेचे मणी.
[हसतात]

[डॉक्टर नाडकर्णी यांचं घर. रमेश, अजय व साधना बोलत बसले आहेत.]

रमेश - काय ताई, कसा काय झाला तुझा अमेरिकेचा दौरा? काय काय बघितलंत? कॉन्फरन्स कशी काय झाली? अन् तुमचा शोधनिबंध? त्याच्याविषयी सांग ना. दमला असाल ना इतक्या लांबवरच्या प्रवासानं.

<u>साधना</u> – हो ना. दोन दिवस झाले की आम्हाला घेऊन. दौरा छानच झाला. परिषदेत अशा अपघातात सापडलेल्या दुर्दैवी जीवांच्या करूण कहाण्या विस्तारानं ऐकायला मिळाल्या; नवनवीन उपचारतंत्रं पहायला मिळाली. तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्यानं ऐकायला मिळाली. पण आम्हीच नव्हे तर परिषदेला हजर असलेल्या बहुतेकांचे चेहरे उदास, खिन्न होते.

<u>रमेश</u> – का बरं?

<u>साधना</u> – कुठेतरी एक टोचणी प्रत्येकाच्या मनाला लागलेली होती की माणसाचं भलं होण्यासाठी सातत्यानं प्रयत्न चाललेले असताना असे अपघात आपल्याला पूर्णपणे का टाळता येऊ नयेत? कुणाचा तरी हलगर्जीपणा अन् गलथानपणा यामुळं अश्राप जीवांना काय काय भोगावं लागतंय.

<u>अजय</u> – ही या गोष्टीची एक बाजू झाली साधनाताईजी पण मुद्दाम वापरलेल्या संहारक अण्वस्त्रांचं काय? राष्ट्राराष्ट्रांमधील भांडणं, द्वेष, हेवेदावे यामुळं व स्पर्धा, अधिकार गाजवण्याची प्रचंड लालसा यामुळं हे जग अणुयुद्धाच्या उंबरठ्यावरती केव्हाच येऊन पोचलंय.

<u>रमेश</u> – अन् त्या महाभयंकारी युद्धानंतर काय होऊ शकेल याचीच छोटी आवृत्ती म्हणजे हा कालूराम गंगाराम.

<u>साधना</u> – मला तर संपूर्ण दौऱ्यात कालूरामच्या प्रकृतीचीच काळजी लागून राहिली होती. हे तर सतत हॉस्पिटलशी फोन करून त्याच्या प्रकृतीची चवकशी करत होते.

~~(डॉक्टर) प्रवेश करत~~

<u>डॉक्टर</u> – (प्रवेश करत) अहो संयोजकांनी आम्हा दोघांचं विमानाचं रिटर्न तिकिट पाठवलं पण ही तर यायला तयारच नव्हती. पण आम्ही निघायच्या वेळी कालूराम तसा ठीक वाटला म्हणून सर्व आवश्यक त्या सूचना इथं देऊन ठेवल्या व मगच आम्ही दोघं निघालो. परिषद संपल्याच्या दुसऱ्या दिवशीच परतीच्या प्रवासाला पण लागलो. मनात असूनही तिथं कुठं फिरायला गेलोच नाही. कालूरामची प्रकृती केव्हाही बिघडू शकते म्हणून लागलीच परतलो.

<u>अजय</u> – डॉक्टरसाहेब, सध्या त्यांच्या संदर्भात मला एकसारखे फोनवर फोन येत आहेत. डायरेक्टरसाहेबांनी पण मला कळवलंय की त्यांना पण वरचेवर धमकी देणारे फोन येत आहेत म्हणून.

<u>डॉक्टर</u> – आश्चर्य आहे. मी पण तुम्हाला हेच सांगणार होतो आत्ता. माझ्याकडे ही एकसारखे फोन येतात. अन् सर्वांचं मागणं एकच, कालूरामचा तपशील द्या. अहो मी सोशलवर्कर बोलतोय अशीच सुरुवात करून कालूरामला नुकसान भरपाई द्या अशी मागणी करतात.

<u>अजय</u> – डायरेक्टरसाहेबांना तर धमकी दिली की हे प्रकरण आम्ही पेपरात आणलं तर, आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन धसाला लावलं तर ते तुमच्या केंद्राला किती महागात पडेल याची तुम्हाला कल्पना आहे का ?

<u>डॉक्टर</u> – अहो, मला तर फोनवरती म्हणाले की कालूरामसारखा अशिक्षित आदिवासी सापडला म्हणून मोफत औषधोपचारावरती भागलं, एखादा शिकलेला शहरी माणूस या अपघातात सापडला असता तर त्यानं तुमच्या केंद्राला किती फरफटत नेलं असतं याची कल्पना करा.

<u>अजय</u> – अहो मला तर एकसारखे तुमचा विभागच बंद करून टाकू असं फोनवरून सुनावतात. दूर जंगलात नाहीतर खोल समुद्रात तुमचं केंद्र घेऊन चला असे सल्ले पण ऐकायला लागतायत.

<u>साधना</u> – इतके दिवस तर कधी कुणाचे फोन येत नव्हते अन आता अचानक त्यांचं प्रमाण इतकं कसं काय वाढलं ? नक्कीच या मागं काहीतरी योजनाबद्ध कट असावा, अन यामध्ये इथलीच आतलीच माणसं असावीत.

<u>रमेश</u> – आमच्या गोरवल्यांचा पण तोच संशय आहे. युनियनच्या लोकांचं हे दबावतंत्र असावं. त्यांची गरविमा योजनेची मागणी पुरी झाली की हे निवळेल. चांगली सोन्यासारखी संधी मिळालीय त्यांना सौदेबाजी करायला. अशी संधी ते बरी सोडतील.

<u>डॉक्टर</u> – पुढच्याच आठवड्यात डायरेक्टरसाहेबांनी त्यांच्याबरोबर मीटिंग बोलावलीय. एकंदरीत कल असा दिसतोय की केंद्राच्याच पैशानं प्रत्येक कर्मचाऱ्याचा विमा उतरवला जाईल अन् या प्रकरणावर कायमचा पडदा पाडला जाईल.

<u>साधना</u> – पण बिचाऱ्या कालूरामाचं काय होईल? तो बरा झाला की त्याला पुन्हा जंगलात जाऊन ~~म~~ रहावं लागेल.

<u>डॉक्टर</u> – नाही साधना. तीच बातमी मला तुम्हाला सांगायचीय. कालूराम आता इथंच राहणार आहे आपल्याबरोबर. कायमचा.

<u>सगळेजण</u> (आश्चर्याने) – काय?

<u>डॉक्टर</u> – होय. आजच मी डायरेक्टरसाहेबांची गाठ घेऊन सगळं काही तपशीलवार ठरवूनच आलोय. तो अभागी जीव इथंच आपल्याबरोबर आपल्या देखरेखीखाली असावा ही नियतीचीच इच्छा दिसते. मंडळी, लक्ष देऊन ऐका. कालूरामला कॅन्सर झालाय – रक्ताचा.

<u>साधना</u> – काय् ब्लड कॅन्सर?

<u>डॉक्टर</u> – होय, ब्लड कॅन्सर. सावकाश पण निश्चितपणे कालूराम आता मरणाकडं घेऊन जाणाऱ्या वाटेनं प्रवासाला निघालाय. अशावेळी त्याचं दुःख आपण वाटून घेऊ या. त्याला याची कल्पना नाही. आपल्या औषधोपचारांबरोबरच त्याला आपल्या प्रेमाची, मायेची नितांत आवश्यकता आहे. आपल्या हॉस्पिटलच्या स्टाफ क्वार्टर्समध्ये त्याला एक खोली दिलीय. त्याला वॉर्डबॉय म्हणून नोकरी द्यायचा निर्णय मी घेतलाय.
[साधना हुंदके देते]

रडू नकोस साधना. आत्ता गाडी येईल. त्याला व त्याच्या बायकोला मी इथं चहाला बोलावलंय. ही नोकरीची ~~तू त्या~~ बातमी तू त्याला सांगायची आहेस. मला ठाऊक आहे की आपल्या प्रत्येकाच्याच डोळ्यात अश्रू जमा होऊन येत आहेत पण त्यांना कठोरपणे परतवून लावू या अन् हसऱ्या ~~चेहे~~ चेहऱ्यानं कालूराम व त्याच्या बायकोचं स्वागत करू या.

[बाहेर मोटारीचा हॉर्न वाजतो]

समाप्त.